# दिवा न्यूज चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## विशेष अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची चित्रे व निकाल जाहीर होणार!

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com

**दिवा:–**शहरातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी दिवा न्यूज आयोजित चित्रकला स्पर्धेला दिवा शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. ही स्पर्धा पहिली ते चौथी आणि पाचवी ते आठवी अशा दोन गटातील स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेऊन या स्पर्धेच्या निमित्ताने दिवा न्यूजचा विशेष अंक प्रकाशित करण्याचा येणार आहे.या विशेष अंकां मध्ये या चित्रकला स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांची चित्रे या विशेष अंकात मध्ये प्रसिद्ध केली जाणार आहेत.

▶ वर्ष–२ ■ अंक–२२ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २ जानेवारी २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिवा शहरातील नागरिकांना उत्तम दर्जाच्या शाळा, रुग्णालय व अन्य सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी दिव्यात क्लस्टर योजना प्राधान्याने राबवणार

## खासदार श्रीकांत शिंदे यांची दिवा महोत्सवाच्या समारोपप्रसंगी घोषणा



दिवा न्यूज विशेष

**दिवा:– ठाण्याप्रमाणे दिवा शहरातील नागरिकांना क्लस्टर योजनेचा लाभ मिळावा यासाठी ठाणे महापालिकेच्या माध्यमातून दिव्याला प्राधान्य क्रम दिला जाणार असल्याची घोषणा कल्याण लोकसभेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिवा महोत्सवच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी बोलताना केली.**

यावेळी ठाण्याचे माजी महापौर नरेश मस्के, माजी उपमहापौर रमाकांत मढवी, माजी नगरसेवक शैलेश पाटील,गणेश मुंडे,उमेश भगत,अमर पाटील, आदेश भगत,निलेश पाटील यांसह बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले की, दिवा शहराच्या विकासासाठी जे सहकार्य लागेल ते ठाणे महानगरपालिका,राज्य सरकार आणि केंद्र सरकार वेळोवेळी करत आले आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून दिवा शहरातील नागरिकांना रेल्वेच्या विविध सेवा सुविधा पुरविण्यासाठी आपण पुढाकार घेतल्याचे खासदार शिंदे यांनी यावेळी सांगितले. त्याचबरोबर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने दिवा शहरासाठी रस्ते व विविध प्रकल्पांसाठी विशेष निधी उपलब्ध झाल्याचे देखील श्रीकांत शिंदे यांनी यावेळी सांगितले. सुमारे सातशे ते आठशे कोटींची विकास कामे दिवा शहरात मागील पाच वर्षात येथील नगरसेवकांच्या माध्यमातून झाल्याचे श्रीकांत शिंदे यांनी यावेळी सांगितले. दिवा शहरातील डम्पिंग ग्राउंड ३१ जानेवारी पर्यंत कायमचे बंद केले जाईल असे आश्वासन देखील यावेळी खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिले. दिवा शहरातील नगरसेवकांच्या कामाचे कौतुक करताना आगामी काळात दिवा शहरातील अनधिकृत घर हा शिक्का कायमचा पुसण्यासाठी दिव्यात क्लस्टर योजना प्राधान्याने राबवली जाणार असल्याची घोषणा यावेळी श्रीकांत शिंदे यांनी केली. या क्लस्टर योजनेची सर्वेक्षण लवकरच सुरू होतील असेही श्रीकांत शिंदे यांनी यावेळी सांगितले.दिवा शहरातील नागरिकांना चांगल्या दर्जाच्या शाळा, रुग्णालय,मुलांना खेळण्यासाठी उद्यान मिळावीत यासाठी भविष्यात उत्तम दर्जाचे दिवा शहर वसवले जाईल असेही ठिकाण शिंदे यांनी यावेळी सांगितले.यावेळी दिवा शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# या आधीही दिवावासीयांसोबत यापुढेही दिवावासीयांसोबत ठामपणे उभे राहू...



## शहराच्या विकासासाठी बाळासाहेबांची शिवसेना कायमच दिवावासीयांच्या बाजूने उभी असेल मा.उपमहापौर रमाकांत मढवी यांची दिवा महोत्सव सांगता कार्यक्रमात नागरिकांना ग्वाही

**दिवा:–**बाळासाहेबांची शिवसेना या आधीही दिवावासीयांच्या समस्या सोडवण्यासाठी कायम तत्पर राहिली असून यापुढेही बाळासाहेबांची शिवसेना दिव्याच्या विकासासाठी तसेच आपत्कालीन परिस्थितीत दिवावासीयांना साथ देण्यासाठी दिवावासीयांसोबत असेल अशी ग्वाही बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे दिवा शहर प्रमुख माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांनी दिवा महोत्सवच्या सांगता कार्यक्रम प्रसंगी उपस्थित नागरिकांना दिली.

धर्मवीर मित्र मंडळ व बाळासाहेबांची शिवसेना यांच्या माध्यमातून २५ डिसेंबर ते ३० डिसेंबर दरम्यान शहरातील प्रेरणा टॉवर परिसरात दिवा महोत्सवचे आयोजन करण्यात आले होते. दिवा महोत्सवचे यंदाचे चौदावे वर्षे होते.दिवा शहरातील नागरिकांना मनोरंजनाचे व्यासपीठ मिळावे या हेतूने दिवा महोत्सव आयोजित केला जातो असे रमाकांत मढवी यांनी महोत्सवाच्या सांगता समारोप प्रसंगी बोलताना सांगितले. यावेळी उपस्थित नागरिकांना संबोधित करताना रमाकांत मढवी म्हणाले की बाळासाहेबांची शिवसेना दिवा शहरातील समस्या सोडवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करत असून याआधीही आम्ही दिवावासीयांसोबत उभे राहिलो असून यापुढेही बाळासाहेबांची शिवसेना दिवा शहराच्या विकासासाठी माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व खासदार श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली कायमच पुढाकार घेईल असे मढवी यावेळी म्हणाले.उपस्थित नागरिकांना मढवी यांनी नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देताना विकासासाठी बाळासाहेबांची शिवसेना दिवा शहरातील नागरिकांसोबत असेल असे आवर्जून सांगितले.

# शितल खरटमलची आंतरराष्ट्रीय पातळीवर सुवर्ण कामगिरी

## जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर घेतली झेप

**ठाणे :** ठाणे ग्रामीण पोलिस दलात असलेल्या शितल खरटमलने आंतरराष्ट्रीय मार्शल आर्ट स्पर्धेत भरीव कामगिरी करताना विविध दोन स्पर्धांमध्ये दोन सुवर्ण आणि एक रौप्यपदकाची कमाई केली आहे.

शितलने हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथे झालेल्या वर्ल्ड स्पोर्ट्स अँड हॅन्सी कप कॅम्पो कराटे स्पर्धेत दोन सुवर्ण आणि एक रौप्यपदक जिंकून देशाला गौरव मिळवून दिला आहे. २४ देशातील खेळाडूंचा समावेश असलेल्या या स्पर्धेत तिने वर्चस्व राखताना काता आणि वेपन प्रकारात सुवर्णपदक आपल्या नावे केले. तर फाईट प्रकारात मात्र शितलला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत अमेरिका, किरगिस्तान, मंगोलिया, फ्रांस, इटली, पोलंड, कझाकिस्तान आणि इतर देशांच्या खेळाडूंचा सहभाग होता.

या स्पर्धेनंतर कझाकिस्तानमध्ये झालेल्या युनायटेड वर्ल्ड कुराश स्पर्धेत शितलने भारताचे प्रतिनिधित्व केले. ५४ देशांचा समावेश असलेल्या या स्पर्धेआधी जागतिक क्रमवारीत शितल नवव्या क्रमांकावर होती. परंतु ज्यूडो मार्शल आर्टस्पर्धांमधील आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक खेळाच्या अनुभवपणाला लावत शितलने सरस कामगिरीकरत शितलने थेट पाचव्या क्रमांकावर उडी मारली. जागतिक क्रमवारीत पहिल्या पाचात आल्यामुळे एकप्रकारे तिच्या नावे वर्ल्ड चॅम्पियन चा 'किताब जमा झाला आहे. शितलने आपल्या यशाचे सारे श्रेय भाजीपाला विकून तिच्या खेळाच्या सरावाकरता जमापुंजी गोळा करणारे आईवडिल, खेळाचे प्रमुख प्रशासकीय अधिकारी तांबोळी सर, संघ व्यवस्थापक ओमर मुख्तार, प्रशिक्षक मधुकर पगडे, अमोल साठे यांना देते. शितलच्या या यशाबद्दल राज्याचे पोलीस महासंचालक, ठाणे ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी आदींनी तिचे अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्र ऑलिम्पिक गेम्समध्ये ठाण्यातील सात खेळाडूंची निवड



**ठाणे:** महाराष्ट्र ऑलिम्पिक गेम्स २०२२-२३ ही स्पर्धा पुणे बालेवाडी येथे ४ आणि ५ जानेवारी २०२३ रोजी तब्बल ३० वर्षांनंतर आयोजिण्यात आली आहे. ठाणे महानगरपालिका प्रशिक्षण योजनेअंतर्गत सराव करणारे ते सात खेळाडू महाराष्ट्र ऑलिम्पिक गेम्समध्ये सहभागी होत आहेत.निधी सिंग ४०० मीटर आणि ४०० मीटर अडथळा शर्यतीत पात्र ठरली आहे. आकांक्षा गावडे २०० मीटरमध्ये पात्र, सानिका, आकांक्षा आणि ईशा या ४x१० मीटर ठरली आहे. ईशा नेगी ४०० मीटर हर्डल्समध्ये पात्र ठरली आहे. निधीरिले आणि ४x ४०० मीटर रिले संघाचा भाग असतील. हर्ष राऊत आणि निखिल ढाके हे पुरुष ४x१० मीटर रिले संघाचा भाग असतील. आल्फ्रेड फ्रान्सिस पुरुषांच्या ४ x ४०० मीटर रिले संघाचा भाग असेल.

*"राज्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंमध्ये ही चांगली स्पर्धा असेल. मी माझे सर्वोत्तम करण्याचा प्रयत्न करेन*
*– निधी सिंग*

*"मी वरिष्ठ खेळाडूंसोबत भाग घेत आहे ज्यामुळे मला माझा अनुभव वाढण्यास मदत होईल. हे खूप रोमांचक असेल*
*–ईशा नेगी*

*"महाराष्ट्रातील सर्वोत्तम खेळाडूंसोबत धावण्याची ही चांगली संधी आहे. हंगामाच्या शेवटी चांगली स्पर्धा*
*– आकांक्षा गावडे*

*"सर्व खेळाडूंसाठी ही खूप चांगली संधी आहे. निधी व्यतिरिक्त इतर सर्व ज्युनियर ॲथलीट आहेत. हे सर्वांसाठी चांगले एक्सपोजर असेल. मला आशा आहे की आमची कामगिरी चांगली होईल.*
*– निलेश पाटकर, प्रशिक्षक*

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# आपदा मित्रांनी मासुंदा तलावात घेतले पूर परिस्थितीमधील बचाव कार्याचे प्रशिक्षण

**ठाणे :** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या आपदा मित्रांच्या पहिल्या तुकडीतील प्रशिक्षणार्थींना गुरुवारी पूरपरिस्थितीतील बचाव कार्याचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले. मासुंदा तलावात बोटीद्वारे बचाव कार्य, पाण्यात सापडलेल्यांना कसे वाचवायचे, पोटात पुराचे पाणी गेल्यावर ते कसे काढायचे यासंदर्भातील प्रशिक्षण देण्यात आले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत आपत्ती काळात मदतीसाठी ठाणे जिल्ह्यात आपदा मित्रांची तुकडी तयार करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. आपदा मित्र प्रशिक्षण वर्गाच्या पहिल्या तुकडीचे प्रशिक्षण सुरु असून या प्रशिक्षणांचा एक भाग म्हणून आज आपदा मित्रांना मासुंदा तळाव पाळी येथे हे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी उपस्थित राष्ट्रीय कॅडेट कोअर, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व आपत्ती व्यवस्थापन विषयक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना पूर आलेल्या ठिकाणी पूर विमोचन बोट घेऊन बचाव कसा करावा, जीव रक्षक कवच कसे घालावे, बचाव कार्य करताना कोणती दक्षता घ्यावी, पाण्यातून बचाव केलेल्या व्यक्तीला प्रथम उपचार म्हणून कोणती कृती करावी याचे प्रात्यक्षिकही यावेळी देण्यात आले. तसेच या आपदा मित्रांकडून प्रत्यक्ष कार्यही करून घेण्यात आले.

निवासी उप जिल्हाधिकारी सुदाम परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली आपदा मित्रांचे प्रशिक्षण होत असून होत असून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.अनिता जवंजाळ, ठाणे अग्निशमन दलाचे प्रमुख ओमकार वैती, महानगर पालिका प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन प्रमुख अविनाश सावंत, यशदा येथील मास्टर ट्रेनर अजित कारभारे, आपत्ती विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आपदा मित्र प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना वैती म्हणाले की, वेधशाळेकडून वर्तविलेला अंदाज लक्षात घेऊन संभाव्य पूरपरिस्थितीला सामोरे जाण्यासाठी तयार राहिले पाहिजे. पुराची पूर्वसुचना मिळताच उपलब्ध साधनांचा वापर करुन जिवीत व वित्तहानी होणार नाही यांची काळजी आपदा मित्रांनी घ्यावी. पूर येऊन गेल्यावर जखमींना मदत करण्यासाठीही योग्य खबरदारी घ्यावी.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ.अनिता जवंजाळ म्हणाल्या की, अतिवृष्टी, धरणफुटी, ढगफुटी यामुळे येणाऱ्या आपत्तीसाठी आपदा मित्रांची मदत महत्वाची ठरणार आहे. पूरपरिस्थितीमध्ये नागरी जीवन विस्कळीत होते. ते पूर्वपदावर आणण्यासाठी आपदा मित्र उपयुक्त ठरतील. पुरभागात बचाव कार्यासाठी जीव रक्षकांना मदतीसाठी बोलविण्यासाठी ११२ किंवा १०८ किंवा १०७७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# आगीत ४ मीटर बॉक्स जळून खाक

ठाणे: येथील दादोजी कोंडदेव स्टेडियम समोरील आंबेडकर हाउसिंग सोसायटीतील 'ए' विंगच्या तळ मजल्यावरती असेलल्या महावितरणच्या मीटर बॉक्स रुममध्ये आग लागल्याची घटना बुधवारी दुपारी सव्वाबाराच्या सुमारास घडली. या घटनेत तेथील ४ मीटर बॉक्स जळून खाक झाले आहेत.ही आग अवघ्या पंधरा मिनिटांत नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले.

या घटनेची माहिती मिळताच, घटनास्थळी महावितरणचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली, आगीवर अग्निशमन दलाच्या जवानांनी १२:३० वाजताच्या सुमारास पूर्णपणे नियंत्रण आणण्यात यश आले. यामध्ये कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिवा न्यूज **विशेष संपादकीय**

# नव्या वर्षात प्रवेश करताना, हा संकल्प करायला हवा..!

इतिहासातून आपण बोध घेतला पाहिजे. ज्या चुका इतिहासात झाल्या त्या सुधारायला हव्यात. ज्या समस्यांना, ज्या अडचणींना मागील काही वर्षांमध्ये आपण नागरिक म्हणून सामोरे गेलो. त्या समस्या,त्या अडचणी, ते प्रश्न नव्या वर्षात सोडवण्यासाठी आपण नागरिक म्हणून काय पुढाकार घेतो हा विषय महत्त्वाचा आहे.

आपल्याकडे शहरी भागात सुद्धा आज पूर्णतः लोकशाही मूल्य रुजली आहेत असं म्हणणं धाडसाचं ठरेल. सुशिक्षित वर्गात सुद्धा लोकशाही हक्क अधिकारांबाबत आजही कमालीची अनास्था असलेली पहायला मिळते. दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुका आणि त्यासाठी होणारे मतदान यापूर्तीच लोकशाही अनेकांच्या मनामध्ये रुजलेली दिसते. त्या पलीकडं लोकशाहीमध्ये नागरिक म्हणून आपण या व्यवस्थेचे प्रमुख आहोत या व्यवस्थेचे सेवक, नोकर निवडण्याचा अधिकार आपल्याला आहे... याचा विसरच बहुदा शहरात राहणाऱ्या अनेक शिक्षित लोकांना अलीकडे पडलेला दिसतो...

परिणामी नवीन वर्षात प्रवेश करताना प्रत्येक नागरिकांनी या लोकशाहीतील एक महत्त्वाचा घटक, एक जबाबदार नागरिक म्हणून आपल्या प्रश्नांचा.. आपल्या समस्यांचा पाठपुरावा करण्यासाठी ते प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. जे प्रश्न तीन ते चार वर्षात सुटायला हवेत, असे प्रश्न सुटण्यासाठी सुद्धा दहा पंधरा वर्षे लागतात.. या मागचे कारण नेमके काय? याचं आत्मपरीक्षण या लोकशाहीतील प्रमुख घटक म्हणून प्रत्येक नागरिकांनी करायला हवं. कोणीतरी मसिहा येईल आणि आपले प्रश्न सोडवेल या मानसिकतेतून लोकशाहीत वावरणाऱ्या नागरिकांनी बाहेर पडायला हवं. लोकशाहीमध्ये लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी सर्वात मोठी शक्ती कोणती असेल तर ती सर्वसामान्य नागरिक हीच होय!नागरिकच या लोकशाहीमध्ये सर्वोच्च आहेत. दुर्दैवाने अलीकडच्या व्यक्ती केंद्रित राजकारणाने सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षा या एका व्यक्तीकडून वाढलेल्या दिसतात... किंवा त्या विशिष्ट प्रचारतंत्राच्या माध्यमातून वाढवल्या जातात! लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रमुख घटक असणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांनी हे समजून घेतलं पाहिजे की लोकशाहीमध्ये सर्वसामान्य नागरिक हेच सुपर पॉवर आहेत.परिणामी आपल्या हक्क आणि अधिकारांची जाणीव प्रत्येक नागरिकाला होईल किंबहुना प्रत्येक नागरिकांनी आपली कर्तव्य, आपले हक्क जाणून घेऊन आपला विकास आपण कसा करू शकतो.. कसा करून घेऊ शकतो... या दृष्टीने वाटचाल करण्याचा निश्चय या नव्या वर्षात करायला हवा असं आम्हाला वाटतं! सर्व नागरिकांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

**– संपादक,** दिवा न्यूज

# शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी ज्यांना पक्षातील महत्त्वाची पदे दिली तेच पलटले

## संजय घाडीगावकर यांचा मुख्यमंत्र्यांवर पलटवार



**ठाणे: हिऱ्याच्या पोटी गारगोटी जन्माला आली असे म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपण शिवसेनाप्रमुख कै बाळासाहेब ठाकरे यांचा अपमान करत आहात असा पलटवार शिवसेना उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी केला आहे. मुख्यमंत्र्यांना सत्तेची नशा चढली असून कै बाळासाहेबांना विनाकारण या राजकारणात ओढण्याचे काम त्यांच्याकडून होत असल्याचे घाडीगावकर यांनी म्हटले आहे.**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत हिऱ्याच्या पोटी गारगोटी जन्माला आली अशी टीका केली .या टिकेला प्रतिउत्तर देताना शिवसेनेचे ठाणे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी मुख्यमंत्र्यांचा चांगला समाचार घेतला आहे. याबाबत केलेल्या ट्विटमध्ये संजय घाडीगावकर यांनी म्हटले आहे की, मुख्यमंत्री अधिवेशनात म्हणाले.. हिऱ्याच्या पोटी गारगोटी जन्माला आली.. मुख्यमंत्री याच गारगोटीने तुम्हाला पक्षांतर्गत विरोध असताना पहिल्यांदा कॅबिनेट मंत्री केले. ठाणे जिल्ह्याचे सर्वेसर्वा केले. दुसऱ्यांदा सर्वात महत्त्वाचे नगरविकास मंत्रीपद दिले आणि त्यांनाच दगा देऊन तुम्ही मुख्यमंत्री झालात. चांगले पांग फेडत आहात. अशा शब्दात घाडीगावकर यांनी मुख्यमंत्र्यांचा समाचार घेतला आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या काळातच एकनाथ शिंदे यांना महत्वाची पदे मिळाली. शिवसेना पक्षांमध्ये दोन नंबरचे स्थान उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांना दिले आणि त्यांनीच उद्धव ठाकरे यांच्या पाठीत खंजीर खुपसून CBI, ED, IncomeTax चा ससेमीरा मागे लागू नये म्हणूनच शिवसेना पक्ष फोडला, असा आरोप घाडीगावकर यांनी केला आहे. मुख्यमंत्री कै. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचाही अपमान करत असल्याचे घाडीगावकर यांनी म्हटले आहे. कै बाळासाहेबांसारख्या दैवी पुरुषाच्या पोटी गारगोटी जन्माला आली असे म्हणताना मुख्यमंत्र्यांना काहीच वाटले नाही का? असा सवालच घाडीगावकर यांनी केला आहे.

# एसआरएतील झोपडपट्ट्यांच्या संतापाला अधिवेशनात वाट

## मिनी क्लस्टर योजना आणण्याची आ. संजय केळकर यांची मागणी



**ठाणे:** आधीच एसआरए योजनेची प्रक्रिया सुरू झालेल्या झोपडपट्ट्यांना क्लस्टर योजनेत समाविष्ट करण्यास रहिवाशांनी विरोध दर्शविला असून त्याचे पडसाद हिवाळी अधिवेशनात उमटले. आमदार संजय केळकर यांनी याबाबत प्रश्न उपस्थित करून रहिवाशांची बाजू ठामपणे मांडली. मिनी क्लस्टर योजना आणल्यास 'एसआरए'तील झोपड्यांना क्लस्टरमध्ये समाविष्ट करण्याची गरजच भासणार नाही, अशी सूचनाही त्यांनी केली.

भाजपा-शिवसेना युती सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे शहरात क्लस्टर योजना आणली. तत्पूर्वी शहरात एसआरए योजनेच्या माध्यमातून झोपडपट्टी भागाचा पुनर्विकास होत होता. आता क्लस्टर योजनेला सुरुवात झाली असून यात एसआरए योजनेची प्रक्रिया सुरू झालेल्या झोपडपट्ट्यांचाही समावेश क्लस्टर योजनेत केला जात आहे. यास तेथील स्थानिक झोपडीधारकांचा विरोध वाढू लागला आहे. राबोडी विभागातील मार्क्सनगर या झोपडपट्टीतील रहिवाशांनी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करून एसआरए योजना राबवण्याची प्रक्रिया सुरू केली होती, मात्र त्यांना अंधारात ठेवून हा भाग क्लस्टर योजनेत समाविष्ट होत असल्याची कुणकुण लागल्याने त्यांनी आमदार संजय केळकर यांना भेटून त्यांची बाजू मांडली. त्यावेळी केळकर यांनी झोपडपट्टीवासींच्या भूमिकेला पाठिंबा दर्शवत त्यांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. अशा अनेक झोपडपट्ट्यांमधील रहिवाशांनी त्यांच्या भावना व्यक्त करून केळकर यांच्याकडे न्यायाची मागणी केली होती.

अधिवेशनात आमदार केळकर यांनी अशा हजारो झोपडीधारकांची बाजू ठामपणे मांडली. क्लस्टर योजनेच्या अंतर्गत ठाणे शहरात ४४ आराखडे तयार करण्यात आले आहेत. हे आराखडे प्रत्येकी १० हजार चौरस मीटर क्षेत्रफळाचे आहेत. कमी क्षेत्रफळाचे आराखडे म्हणजे मिनी क्लस्टर योजना आणल्यास जाणीवपूर्वक इतर झोपडपट्टी भागांना क्लस्टरमध्ये समाविष्ट करण्याची गरज उरणार नाही. तसेच २०११ पर्यंतच्या झोपड्या एसआरए योजनेसाठी पात्र करण्यात आल्या असून त्यांना किती शुल्क आकारायचे याबाबतचा निर्णय अद्याप झाला नसून त्यावरही निर्णय व्हावा, अशी मागणी केळकर यांनी केली.

### धान्यखरेदी घोटाळ्याची एसआयटी करा

***ठाणे जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळाच्या जव्हार कार्यालयांतर्गत २०२०-२१ आणि २०२१-२२ या काळात १३७ कोटींची धान्यखरेदी दाखवण्यात आली आहे. पाठपुराव्यानंतर त्याची चौकशी सुरू झाली आहे. मात्र या घोटाळ्याची चौकशी एसआयटीमार्फत व्हावी आणि तातडीने संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करावे***

***– आमदार संजय केळकर***

# जन्मठेपेची शिक्षा सुनावलेल्या आरोपीने केला सरकारी वकिलांवर हल्ला

## ठाणे जिल्हा व अतिसत्र न्यायालयातील घटना

**ठाणे:** पोटच्या लग्न आणि १४ वर्षीय अल्पवयीन अशा दोन मुलींवर अत्याचार करत एकीला गरोदर करणाऱ्या नराधम ६० वर्षीय पित्याला ठाणे जिल्हा व अतिरिक्त सत्र ( विशेष पोक्सो) न्यायालयाच्या न्यायाधीश व्ही व्ही वीरकर यांनी शुक्रवारी दोषी ठरवत, दोन्ही वेगवेगळ्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. याचदरम्यान आरोपीने मला फाशीची शिक्षा दया अशी मागणी करत जन्मठेपेची शिक्षा झाल्याचा राग मनात धरून सरकारी वकील रेखा हिवराळे यांच्यावर ठाणे न्यायालयात न्यायाधीश आणि पोलिसांसमोर हल्ला चढवला. हा प्रकार शुक्रवारी सकाळ पावणे बाराच्या सुमारास घडला.

रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात २०१८ मध्ये आरोपीने आपल्या पोटच्या दोन मुलींवर अत्याचार केला. त्यातील एका गरोदर केल्याप्रकरणी कलम ३७६ (२) (एफ) (न), ३७६(३) भादवि सह ३, ४, ५ (आय) (एन), ७, ८, ९ (आय) (एन), ११, १२ पोक्सो ॲक्ट नुसार गुन्हा दाखल झाला होता. याचा तपास पूर्ण झाल्यावर रबाळे एमआयडीसी पोलिसांनी ठाणे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले. हा खटला न्यायाधीश व्ही व्ही वीरकर यांच्या समोर आल्यावर सरकारी वकील रेखा हिवराळे यांनी सादर केलेले पुरावे आणि साक्षीदारांची साक्ष ग्राह्य मानून त्या नराधम पित्याला शुक्रवारी न्यायाधीश वीरकर यांनी दोन्ही गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तसेच दोन्ही गुन्ह्यात प्रत्येकी दहा हजार दंड ठोठावला असून दंड न भरल्यास प्रत्येकी १०० दिवस साधी कैदेची शिक्षा भोगावी लागेल असे आदेशही दिले आहेत.

दरम्यान, आरोपीच्या वकील गीता गायकवाड यांनी आरोपीला दोन्ही गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा सुनावली असल्याचे त्यास सांगितले. त्यामुळे आरोपीने शिक्षा लागल्याचे समजल्यानंतर त्याने रागाच्या भरात 'मला फाशीच दयायची होती ना बोलून त्याचे पुढे असलेल्या सरकारी वकील हिवराळे यांच्या अंगावर धावून जाऊन खांदयाला हाताने ठोसा मारला. हा प्रकार शुक्रवारी सकाळी पावणे बाराच्या सुमारास घडला.




# ठाण्यात वागळे इस्टेट येथे रिक्षाला आग

**ठाणे:** वागळे इस्टेट, रोड क्रमांक:-२२ येथील अण्णाभाऊ साठे चौक जवळ पार्क केलेल्या रिक्षाला आग लागल्याची घटना शनिवारी अडीच वाजण्याच्या सुमारास समोर आली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवानांनी धाव घेत, आगीवर नियंत्रण मिळविले. तसेच या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# ठाणे रेल्वेस्थानक आधुनिकीकरणाच्या कामात महापालिकेचाही सहभाग महत्वाचा

**ठाणे :** ठाणे रेल्वे प्रशासनाच्या माध्यमातून ठाणे रेल्वे स्थानकाच्या आधुनिकीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्याबाबतच्या अंमलबजावणीची दिशा ठरविण्यासाठी रेल्वेचे अधिकारी व महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांची संयुक्त बैठक नुकतीच पार पडली. ठाणे रेल्वेस्थानकातील प्रवाशांची गर्दी कमी होण्याबरोबरच अद्ययावत सेवासुविधा उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीकोनातून हाती घेण्यात येणाऱ्या कामामध्ये महापालिकेचा सहभाग महत्वाचा आहे. रेल्वे स्थानक परिसरातील प्रवाशांची ये-जा सुलभ होईल व वाहतूक जलदगतीने होण्यासाठी उपाययोजना कराव्यात अशा सूचनाही आयुक्तांनी यावेळी संबंधितांनादिल्या.

या बैठकीत रेल्वे प्रशासनाच्या वतीने मुख्य प्रकल्प अधिकारी मिश्रा, महापालिकेचे प्रकल्प अधिकारी प्रवीण पापळकर आदी उपस्थित होते.

### रेल्वे काय करणार आणि त्याची उपयुक्तता

ठाणे रेल्वे स्थानक हे ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचे असून सर्वात गर्दीचे स्थानक आहे. उपनगरीय गाड्यासह लांब पल्ल्याच्या गाड्या देखील मोठ्याप्रमाणावर थांबत असल्याने दैनंदिन ६.५ प्रवासी प्रवास करतात. आज एक हजाराहून अधिक गाड्यांची ये-जा आहे. त्यामुळे सद्यस्थित असलेल्या ११ प्लॅटफॉर्मवर पूर्व- पश्चिम जोडणारा भव्य डेक तयार करण्यात येणार आहे. या डेकमुळे प्रवाशांची गर्दी कमी होण्याबरोबर सुरक्षिततही राखली जाणार आहे. या डेकवर प्रवाशासांठी आवश्यक प्रतीक्षागृह, तिकिटघर, शौचालय आदी सेवासुविधा उपलब्ध असणार आहेत. सदरचा डेक हा ठाणे पश्चिम व पूर्वेकडील सॅटिस प्रकल्पाला जोडला जाणार आहे. तसेच रेल्वेच्या अखत्यारित असलेल्या बाहेरील बाजूकडील जागेत दोन व चार चाकी वाहनांसाठी बहुमजली पार्किंग प्लाझा, तीन ते चार व्यावसायिक इमारतीचे बांधकाम रेल्वेमार्फत करण्यात येणार आहे.

देशातील पहिली रेल्वे बोरीबंदर ते ठाणे दरम्यान १८५० मध्ये धावली. कोळशावर धावलेल्या रेल्वेची प्रतिकृती, त्याचबरोबर याचा संपूर्ण इतिहास नागरिकांना माहित व्हावा अशा स्वरुपाचे वस्तुसंग्रहालय या ठिकाणी उभारण्यात येणार आहे.

रेल्वे स्टेशनमधून पुर्वेला ३० टक्के तर पश्चिमेला ७० टक्के प्रवासी बाहेर पडतात. ठाणे पश्चिमेला गोखले रोड व शिवाजी पथ या मार्गावर मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी होते. ही गर्दी होवू नये यासाठी हा परिसर फेरीवाला मुक्त करणे, तसेच पार्किंगच्या अतिरिक्त सुविधा उपलब्ध करुन देणे, त्या भागातील वाहतूकीच्या नियोजनाच्या पुर्नरचना अशा पध्दतीने करणे जेणेकरुन पादचाऱ्यांसाठी रेल्वेस्थानकाबाहेर चालण्यासाठी मोठी जागा उपलब्ध होवून परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल या दृष्टीने करावे असे बांगर यांनी नमूद केले. सद्यस्थितीत ठाणे पूर्व येथे सॅटिसचे काम सुरू असल्यामुळे प्रवाशांचा अतिरिक्त ताण हा पश्चिमेकडील बाजूस येत आहे. ठाणे पूर्व येथील पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून येत्या ८ ते १० महिन्यात या पुलाचे काम पूर्ण होईल, त्याचबरोबर पुर्वेला बस टर्मिनन्सचा प्रस्ताव आहे, त्यानुसार पुल व बस टर्मिनस पूर्ण झाल्यावर पुर्वेकडील वाहतूकही सुरळीत होण्यास मदत होणार असे आयुक्तांनी यावेळी सांगितले. सदर बैठकीत प्राथमिक स्तरावर चर्चा करण्यात आली, आणि वाहतूक उपायुक्त यांचेसोबत पुढील बैठकीचे आयोजन करुन धोरण अंतिम करण्यात यावे व तसा अहवाल महापालिका आयुक्त बांगर यांचेसोबत पुन्हा बैठक घेवून सादर करण्यात यावा असे या बैठकीत ठरविण्यात आले.

# पारसिक नगरातील राखीव भूखंडांवर नागरी सुविधा उभारा

## डॉ. जितेंद्र आव्हाड यांचे पालिका आयुक्तांना पत्र



**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात पारसिक नगर परिसरासाठी निर्देशित केलेले राखीव भूखंडांवर नागरी सोयीसुविधा निर्माण करुन ते नागरिकांसाठी खुले करावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री,आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी पालिका आयुक्तर अभिजीत बांगर यांच्याकडे केली आहे.

पारसिक नगर परिसरामध्ये नागरी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात काही राखीव भूखंडाची तरतूद करण्यात आलेली आहे. पारसिक नगर हा परिसर ठाणे महानगरपालिकेच्या शहर विकास आराखड्याद्वारे संपूर्ण अधिकृत वसाहत म्हणून गणला गेला आहे. या परिसराचे सौंदर्य जपणे आवश्यक आहे. या परिसरामध्ये नागरिकांसाठी मार्केट, मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,खेळाचे मैदान, परिसरातील मुलांसाठी शाळा, सुसज्ज नाट्यगृह, बालोद्यान व उद्यान, शालेय विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, ज्येष्ठ नागरिकांसाठी वाचनालय व विरंगुळा केंद्र आदी सुविधा ठामपाच्या विकास आराखड्यामध्ये नमूद करुन येथील भूखंड राखीव ठेवण्यात आलेले आहेत. त्यामुळे ठाणे महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात पारसिक नगर परिसरासाठी राखीव असलेल्या भूखंडावर नागरी सोईसुविधा प्राधान्यक्रमाने उपलब्ध द्याव्यात, अशी मागणी डॉ. आव्हाड यांनी केली आहे.

# पैसे घेऊन घरे देण्यास टाळाटाळ

## विकासकांवर होणार कारवाई

### आमदार संजय केळकर यांच्या मागणीची उपमुख्यमंत्र्यांकडून दखल

**ठाणे:** सर्वसामान्य नागरिकांकडून पैसे घेऊन इमारतीची एकही वीट न रचता फसवणूक करणाऱ्या विकासकांवर गुन्हे दाखल करून कारवाई करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

आमदार संजय केळकर यांनी सभागृहात ठाण्यातील विकासकांकडून होत असलेल्या फसवणुकीचा मुद्दा उचलून घराचे स्वप्न पाहणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना दिलासा दिला. मुंबईप्रमाणेच ठाण्यातही विकासकांचा धुमाकूळ सुरू आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय ठाणेकरांनी हक्काच्या घराचे स्वप्न पाहत गृहकर्जे घेऊन विकासकांना पैसे दिले, मात्र इमारतीची एकही वीट रचली गेली नसल्याचे आ. केळकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले. एकीकडे पैसे घेऊन इमारतीचे बांधकाम केले जात नाही तर दुसरीकडे हेच विकासक दुसऱ्या कंपनीच्या नावाने इमारती बांधत असल्याचे दिसून येत असल्याचेही केळकर यांनी स्पष्ट केले.

ठाण्यात अशा तीन विकासकांनी ग्राहकांची फसवणूक केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत तर एका विकासकाविरोधात तब्बल १८ गुन्हे दाखल आहेत. अशा विकासकांविरुद्ध कठोर कारवाई करून गृह कर्जाचे हप्ते भरून हतबल झालेल्या सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्याची मागणी केळकर यांनी केली.

यावर उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तक्रारींची दखल घेत संबंधित विभागांना सूचना केल्या. रेरा कायदा येण्यापूर्वी विकासकांचे अनेक फसवणुकीचे प्रकार होत होते, रेरा कायदा आल्यानंतर हे प्रकार कमी झाले आहेत. मात्र यापुढे फसवणुकीच्या तक्रारी आल्यास आर्थिक गुन्हे शाखेसह अन्य विभागांनी यावर कडक कारवाई करावी. गरज भासल्यास एसआयटी स्थापन करून चौकशी केली जाईल, असे फडणवीस यांनी सांगितले.

# पुनर्विकास रखडलेल्या इमारतींचा आवाज अधिवेशनात दुमदुमला

## भूमिगत मेट्रोमुळे सुमारे ७० ते ८० इमारतींचा पुनर्विकास रखडला

**ठाणे:** नियोजित अंतर्गत भूमिगत मेट्रोमुळे जुन्या ठाण्यातील सुमारे ७५-८० जुन्या इमारतींचा पुनर्विकास मंजुरी मिळत नसल्याने रखडला आहे, त्यामुळे हजारो नागरिकांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे. आमदार संजय केळकर यांनी आज अधिवेशनात हा मुद्दा पुन्हा उचलून सभागृहाचे लक्ष वेधले. या प्रकरणी लवकरच मेट्रो प्राधिकारणाशी समन्वय साधून तोडगा काढण्याचे आश्वासन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी दिल्याने रहिवाशांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला आहे.

ठाणे शहरातील विविध भागांना जोडणारी रिंग मेट्रो प्रस्तावित असून सिडको बसथांबा ते पूर्व द्रुतगती महामार्गादरम्यान हा मार्ग भूमिगत करण्यात आला आहे. हा मार्ग ज्या परिसरातून जातो, त्या भागात अनेक इमारती या ४० वर्षे जुन्या असून धोकादायक स्थितीत आहेत. येथील हजारो नागरिक जीव मुठीत धरून रहात आहेत. या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी महापालिकेत प्रस्ताव सादर करण्यात आले असून मंजुरी अभावी रखडलेले आहेत.

या मार्गावरून भूमिगत मेट्रो प्रस्तावित असल्याने पुनर्विकासाचा मंजुरी देत येत नसल्याचे सांगण्यात येत असल्याने नागरिक भीतीने ग्रस्त आहेत. या रहिवाशांनी आज मंगळवारी महापालिका मुख्यालयासमोर आंदोलन करत आयुक्त अभिजित बांगर यांना निवेदन दिले.

या प्रकरणी सातत्याने आवाज उठवणारे आमदार संजय केळकर यांनी अधिवेशनात हा मुद्दा पुन्हा उचलून धरला. ठाण्यातील या भूमिगत मार्गामुळे स्टेशनलगतच्या सुमारे ५० जुन्या आणि धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाला मंजुरी देण्यात येत नाही, त्यामुळे हजारो रहिवासी जीव मुठीत घेऊन राहत आहेत. या प्रकरणी तातडीने तोडगा काढण्यात यावा, अशी मागणी केळकर यांनी केली.

तत्पूर्वी केळकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून निवेदन दिले आणि या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आणून दिले. यावर लवकरच मेट्रो प्राधिकरणाची बैठक घेऊन योग्य तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांनी दिले.

# समतानगरसमोरील वळण रस्ता तडकाफडकी बंद

## वाहतूक बदलाविरोधात स्थानिक रस्त्यावर

## प्रशासनाला निवेदन देत आंदोलनाचा इशारा

**ठाणे :** प्रचंड रहदारी वाढलेल्या पोखरण रोड क्रमांक १ वरील समतानगर समोर असलेला 'यु टर्न' गेल्या काही दिवसांपासून अचानकपणे लोखंडी डिव्हायडर लावून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ वाहतूक कोंडीतून समतानगर येथून कॅडबरी जंक्शनकडे जाण्यासाठी अथवा वर्तकनगर येथून येत रेमंड कंपनीसमोर समतानगरकडे वळण घेताना स्थानिकांना मनस्ताप सहन करावा लागतो. या जाचक वाहतूक बदलाबाबत समतानगरवासियांनी मंगळवारी आवाज उठवला असून गैरसोय चालू... रस्ता बंद अशा घोषणा देत रोष व्यक्त केला. यासोबतच ठाणे वाहतूक शाखेचे उपायुक्तांना निवेदन देत तात्काळ हे लोखंडी डिव्हायडर हटवून रस्ता पूर्ववत खुला करण्याची मागणी केली. तसेच नागरिकांच्या मागण्यांचा विचार न करता हा बदल केल्यास जनक्षोभ उसळून स्थानिक उग्र आंदोलन करतील, असा इशाराही नागरिकांनी दिला.

समतानगरमधून पोखरण मार्ग क्र. एक येथे बाहेर पडल्यानंतर कॅडबरी जंक्शनच्या दिशेने जाण्यासाठी वाहनांना अटकाव करण्यात आला आहे. याठिकाणी दुभाजक टाकण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे समता नगरमधील रहिवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय सुरु आहे. तसेच नागरिकांना वाहतुक कोंडीचाही सामना करावा लागत असल्याने समता युथ फाउंडेशनचे अध्यक्ष आदित्य धुमाळ यांच्या माध्यमातून आज स्थानिकांनी आंदोलन केले. वाहतूक बदल करण्याआधी एक महिना प्रायोगिक तत्वावर वाहतुक वळवुन या प्रभागातील नागरिकांच्या हरकती व सुचना मागवल्या जातात. मात्र तसे न करता दुभाजकाचे काम सुरु केल्याचा आरोप आदित्य धुमाळ यांनी केला. अत्यंत युद्ध पातळीवर कोणाच्या आदेशाने व कोणाचे हित जपण्याकरिता हा घाट घातला जात आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. यावेळी समता नगर सोसायटीमधील रहिवासी पुरूषोत्तम सहस्त्रबुद्धे, पुष्प पराग सोसायटीचे गावकर, कैलास पार्क गृह संकुलातील लब्दे तसेच समता युथ फाऊंडेशन सदस्य योगेश तेली, दर्शन पड्याळ, नितीश पुजारी, दिपेश सुवर्णा, सतीश




अवघडे आदी उपस्थित होते. संबंधित वाहतूक बदल तात्काळ हटवून याठिकाणी रस्ता पूर्ववत करण्यासाठी वाहतूक शाखेला निवेदनही देण्यात आले असून नागरिकांना दिलेल्या पर्यायी वळण रस्त्यामुळे परिसरात कोंडी होत असल्याचे यावेळी स्थानिकांनी सांगितले.

# शहरी शिक्षणाचा कल वाढला

## बंद होण्याच्या मार्गावर असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळा वाचवा!

### कोकणस्थ म्हादे प्रतिष्ठाणचे रविंद्र म्हादे यांचे आवाहन

**रत्नागिरी–** प्रत्येकाचे पाल्य उच्चशिक्षित, उच्चविभूषित व्हायला हवा, अशी पालकांची धारणा असते. त्यामुळे जिल्हा परिषदेतील शाळांतून मुलांना, शिक्षणासाठी शहरात नेले जाते. सध्या शहरी शिक्षणाचा कल वाढला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा यामुळे बंद पडण्याच्या मार्गावर असून त्या वाचवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, असे आवाहन कोकण विभाग म्हादे परिवार संलग्न, कोकणस्थ म्हादे प्रतिष्ठाणचे उपाध्यक्ष रवींद्र म्हादे यांनी व्यक्त केले. हनुमान जयंतीचे सप्ताहाचे औचित्य साधून वर्षाच्या अखेरच्या दिवशी खेड तालुक्यातील सुकीवली गावातील सुकीवली कुणबीवाडी शाळा क्र. २ या जिल्हा परिषदेच्या शाळातील मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

रविंद्र म्हादे म्हणाले की, शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा आहे. प्रत्येकाने यामुळे शिकले पाहिजे. परंतु, सोशल मीडियाच्या युगात सध्या शिक्षणाकडे पालकवर्गाने विशेष लक्ष द्यायला हवे. आजकाल प्रत्येक पालकांना वाटते की, आपला पाल्य उच्चशिक्षित, उच्चविभूषित व्हावा. त्यासाठी गावातील जिल्हा परिषदेच्या शाळा सोडून शहरी शिक्षण पद्धती अणुकारली जात आहे. परिणामी जिल्हा परिषदेच्या शाळांचा पट प्रचंड घसरला असून भविष्यात या शाळा बंद पडतील की काय, अशी भीती कोकण विभाग म्हादे परिवार संलग्न, कोकणस्थ म्हादे प्रतिष्ठाणचे उपाध्यक्ष रविंद्र म्हादे यांनी व्यक्त केली. शिक्षणामुळेच पूर्ण जग पाहता येते. त्यामुळे प्रत्येक पालकांनी सध्याच्या युगाचा कानोसा घेऊन पाल्याच्या जडणघडणीवर भर द्यावा. मात्र या सर्वात जिल्हा परिषदेच्या शाळा टिकवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, असे आवाहन केले.

प्रतिष्ठाणचे सेक्रेटरी काशिनाथ म्हादे यांनी परिवाराची उन्नती आणि भविष्याची व्याख्या विस्तृतपणे मांडली. तसेच आजवर प्रतिष्ठाणकडून शालेय मुलांसाठी घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली. सध्याच्या युगात बदललेल्या मुलांच्या शिक्षण पध्दती, सोशल माध्यमाकडे वाढलेला कल या गोष्टी डोळ्यासमोर ठेवून पालकांनी मुलांच्या संगोपनावर लक्ष द्यावे, असे आवाहन केले. आजच्या काळात शिक्षण का घेणे का महत्वाचे आहे, याबाबत ही मार्गदर्शन केले. शालेय शिक्षिका सीमाताई आंधळे यांनी आयोजक आणि नियंत्रकांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली.

हनुमान मंदिरात हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. शैक्षणिक साहित्य पाहून सर्व चिंमुरड्यांच्या चेहऱ्यावर आनंद द्विगुणीत झाला होता. दरम्यान, शाळेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा अर्धाकृती पुतळा कोकणस्थ प्रतिष्ठाणच्या माध्यमातून भेट म्हणून देण्यात आला. शिंदे गटाचे खेड तालुक्यातील सचिव सचिन धाडवे, ग्रामपंचायत सदस्य परेश जाधव, रोशनी चाळके, बळीराम निकम, समीर राणीम, कोकणस्थ म्हादे प्रतिष्ठाणचे अध्यक्ष संदीप म्हादे, उपाध्यक्ष संजय म्हाद्ये, सेक्रेटरी आणि ईटीव्ही भारतचे वरिष्ठ पत्रकार काशिनाथ म्हादे, कार्याध्यक्ष विलास म्हादे, खजिनदार सत्यवान म्हाद्ये, सदस्य रविंद्र म्हादे, उमेश म्हादे, दिलीप म्हादे, प्रसाद म्हादे, राजेंद्र म्हादे, संतोष म्हादे, प्रमुख सल्लागार समित म्हादे, रमेश म्हादे आदी संस्थेचे पदाधिकारी, शाळेच्या शिक्षिका सीमाताई आंधळे, कल्याणी शिंदे, अंगणवाडी मदतनीस सुप्रिया घाग, परिचारिका सारिखा घाणेकर, सुकीवली गावचे ग्रामस्थ आणि पालकवर्ग मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

# कोकण विभाग शिक्षक मतदारसंघासाठी निवडणूक आदर्श आचारसंहिता लागू

**ठाणे:** भारत निवडणूक आयोगाने विधानपरिषदेच्या कोकण शिक्षक मतदारसंघामध्ये द्विवार्षिक निवडणूक घोषित केले आहे. त्यानुसार कोकण विभागामध्ये निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी सांगितले आहे.

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातील आमदार बाळाराम दत्तात्रय पाटील यांची मुदत ७ फेब्रुवारी २०२३ रोजी संपत आहे. त्यामुळे भारत निवडणूक आयोगाने २९ डिसेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या कोकण विभाग शिक्षक मतदारसंघासाठी निवडणूक प्रक्रिया घोषित केली आहे. त्यानुसार, निवडणुकीची अधिसूचना ५ जानेवारी २०२३ रोजी प्रसिद्ध होणार आहे. नामनिर्देशन पत्रे सादर करण्याची अंतिम तारीख १२ जानेवारी २०२३ आहे. १३ जानेवारी २०२३ रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी होणार असून १६ जानेवारी २०२३ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक आहे. ३० जानेवारी २०२३ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. २ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. ४ फेब्रुवारी २०२३ रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघासाठी पात्र शिक्षक मतदारांना नामनिर्देशन दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत मतदार यादीत नाव नोंदविता येणार आहे. विधानपरिषदेच्या मतदारसंघातील निवडणुकामध्ये पालन करावयाच्या आदर्श आचारसंहितेबाबत भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान तसेच कोवीड १९ विषयीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी शिनगारे यांनी दिले आहे.

# ठाण्यात जुने ऑईलच्या ३ लोखंडी टाक्यांना आग

**ठाणे:** वागळे इस्टेट, रोड क्रमांक-२५,सीपी तलाव या ठिकाणी प्रेसिशन रबर इंडस्ट्रियल प्रा. लि. कंपनीच्या आवारात असलेल्या जुने ऑईलच्या तीन लोखंडी टाक्यांना आग लागल्याची घटना शनिवारी दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास घडली. या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी फोम याचा वापर करण्यात आला. यामध्ये कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती तसेच आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी फोमचे एकुण ०२ ड्रम वापरण्यात आले. आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# मंगळवारी होणार ठाण्यात सावित्रीचा जागर

ठाणे: येत्या मंगळवारी म्हणजेच ३ जानेवारी रोजी ठाणे शहरात सावित्रीमाई फुले यांच्या विचारांचा जागर होणार आहे. सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निमित्त ठाण्याच्या टाऊन हॉलमध्ये एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या ठिकाणी सावित्री-जोतीराव फुले यांच्या वैचारिक संघर्षाबाबत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, चूलखंडातील नागरिकत्व झुगारुन स्वत:ची ओळख प्रस्थापित करणार्या महिलांचाही सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती ओबीसी एकीकरण समितीच्या वतीने देण्यात आली.

नुकतीच ठाण्याच्या शासकीय विश्रामगृहामध्ये ओबीसी एकीकरण समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये ठाणे शहरात सावित्री महोत्सव साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन टाऊन हॉल येथे सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. या कार्यक्रमात डॉ. नवनाथ शिंदे हे सत्यशोधक समाज आणि फुले दाम्पत्य या विषयावर व्याख्यान देणार आहेत. तसेच, टिकली नाकारुन स्व अस्तित्व दाखवणारी पत्रकार रुपाली बिडवे, कॉमनवेल्थमध्ये सुवर्णपदक पटकावणारी वैशाली तांडेल, सामाजिक बंधने झुगारुन सत्यशोधक पद्धतीने विवाह करणारे मराठा समाजातील श्री व. सौ. घाडगे दाम्पत्य, विक्रीकर सहआयुक्त तनुजा मस्करे, वनाधिकारी गिरीजा देसाई, सरकारी वकील रेखा हिवराळे यांचा 'सावित्रीच्या लेकी' या पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास मा. मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, आ. संजय केळकर, निरंजन डावखरे, अॅड. प्रणिती शिंदे, वृषाली वाघुले, मर्जिया पठाण, गिता शाह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## फुले दाम्पत्याला भारतरत्न देण्यासाठी अभियान

भारतामध्ये चूल आणि मूल या संकल्पनेत अडकविलेल्या माय-भगिनींना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी सावित्रीमाई फुले आणि महात्मा जोतिबा फुले यांनी अथक परिश्रम घेतले. प्रतिगामी वृत्तीच्या लोकांच्या विरोधाला न जुमानता या दाम्पत्याने पुण्याच्या भिडेवाड्यात पहिली मुलींसाठी शाळा सुरु केली. आज अवकाशाला गवसणी घालणार्या आणि भारताच्या राष्ट्रपतीपदी विराजमान झालेल्या महिलांकडे पाहिल्यास फुले दाम्पत्याच्या कर्तृत्वाची साक्ष पटते. त्यामुळेच या दाम्पत्याला 'भारतरत्न' या सर्वोच्च किताबाने सन्मानित करावे; तसेच, भिडे वाड्यास राष्ट्रीय स्मारक म्हणून जाहीर करावे, या मागणीसाठी टाऊन हॉल येथे सह्यांची मोहीम राबविण्यात येणार आहे. फुले दाम्पत्याला भारतरत्न देण्यात यावा, या मागणीसाठी सुमारे १० हजार सह्यांचे निवेदन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पाठविण्यात येणार आहे,

## पहिल्यांदाच ठाण्यात सावित्री रॅली

ठाणे शहरात प्रथमच माळी समाजाच्या वतीने 'सावित्री रॅली' चे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता ठाणे रेल्वे स्टेशन येथील बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरुन या रॅलीला प्रारंभ होणार आहे. शिवाजी पथ मार्गे ठाणे बाजारपेठेतून ही रॅली कोर्ट नाका येथील बाबासासाहेबांच्या पुतळ्यासमोर विसर्जित होणार आहे. या रॅलीमध्ये स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीमाई फुले यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यात येणार आहे, असे माळी समाज संघाचे अध्यक्ष नवनीत सिनलकर यांनी सांगितले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com



# दिवा महोत्सवची उत्साहात सांगता!



दिवा:– बाळासाहेबांची शिवसेना आणि धर्मवीर मित्र मंडळ आयोजित दिवा महोत्सवाची सांगता शुक्रवारी ३० डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात झाली.यावेळी बाळासाहेबांच्या शिवसेनेचे दिवा शहरातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. २५ डिसेंबर ते ३० डिसेंबर या दरम्यान दिवा शहरातील नागरिकांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक कलागुणांना वाव देण्यासाठी दिवा महोत्सवाचे आयोजन दरवर्षीप्रमाणे यावर्षीही करण्यात आले होते. दिवा महोत्सवामध्ये आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांना शहरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

## शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद












# दिवा महोत्सवची उत्साहात सांगता!





